# पूर्णतेतील अपूर्णता... एक सौंदर्य

सर्वसाधारणतः एखादी गोष्ट सुंदर दिसते अथवा सौंदर्याचा अविष्कार पेश केला जातो ज्यावेळी त्या गोष्टीत परिपूर्णता असते. परिपूर्णता आपल्या पंचेंद्रियांना सहज जाणवते, त्या परिपूर्णतेचा अविष्कार आणि त्या सौंदर्याचा आनंद पंचेंद्रियांमार्फत घेता येतो. डोळ्यांना दिसणारे सौंदर्य मग ते निसर्गाचे सौंदर्य असू शकते, जसे निळा अथांग पसरलेला समुद्र, शांत पण वाहत्या नदीचे विस्तीर्ण पात्र, त्याच्या सभोवतालचा हिरवा निसर्ग, डेरेदार वृक्षराई इ. तसेच कानांना सुखावणारे सौंदर्य म्हणजे मंजुळ गीत, पक्षांची किलबिल, कोकिळेचा मधुर स्वर इ. स्पर्शाचे सौंदर्य म्हणजे, हाताला हवेहवेसे वाटणारे मऊ मुलायम स्पर्श जशी लोकरीची उबदार वस्त्रे, मऊ मुलायम कापूस, सश्यासरख्या नाजूक आणि मुलायम प्राण्याचा स्पर्श इ. अशी कित्येक सौंदर्याची उदाहरणे आपण रोज बघत असतो आणि अनुभवत असतो.

एखादा आकर्षक युवक अथवा सौंदर्यवती ह्याचे बाह्य सौंदर्य, त्या व्यक्तीला निसर्गाने बहाल केलेल्या परिपूर्ण सममिती अर्थात perfect symmetry मध्ये एकवटलेले असते. कोणतीही symmetrical वस्तू सुंदर आणि आकर्षक दिसते किंबहुना सममिती अथवा symmetry हे सौंदर्याचे मूलभूत अंग आहे.

साधं पिंपळाचे पान बघा ना, त्याची symmetry बघत राहावी. बेलाला आणि पळसाला तीन पाने असतात पण त्याची symmetry खासच. माणसाचे सौंदर्य हे डोळे, नाक, जिवणी, ओठ, सममिती आणि आकर्षक दंतपंक्ती इ. गोष्टींमध्ये एकवटलेले असते. त्या सगळ्या सौंदर्याच्या बाबींचा symmetry हाच गाभा आहे, ज्यामुळे मानवी चेहऱ्याला एक सौंदर्य बहाल होते. ही symmetry अथवा सममिती, एकसारखेपणा, evenness हा सौंदर्याचा एक भाग आहे.

'Symmetry, evenness, colour and it's combination are some basic requirements which in toto impart beauty to the things.'

परिपूर्णता ही डोळ्याला सुखवते आणि सौंदर्याची जाणीव करून देते, परंतु काही परिपूर्णता उपजत अथवा जन्मजात बहाल केलेल्या असतात. जसे धारदार नाक, टपोरे डोळे, भव्य कपाळ, नाजूक जिवणी, सममिती आणि एकसारख्या दंतपंक्ती इ. परंतु ह्या नैसर्गिक आणि बाह्य सौंदयासोबत काही गोष्टी माणूस कालानुरूप आत्मसात करतो - जसे कला, नृत्य, गायन, वादन अश्या अनेक कलाविष्कार माणूस सादर करतो आणि त्यातून आपले कलारूपी सौंदर्य पेश करत असतो. मात्र ह्या

कलारूपी सौंदर्याच्या अविष्कारासाठी त्याला कठोर परिश्रम, रियाज करावे लागते त्याचसोबत परिपूर्णतेची कास धरून त्याला अंगभूत कलागुण ह्याची जोड लागते, जेणेकरून त्या कलाविष्कारातून माणूस स्वतःचे कलात्मक सौंदर्य पेश करत असतो. ह्या परिपूर्णतेच्या हव्यासाने त्याला कित्येक वेळा प्रतिकूल परिस्थितीशी सामना करावा लागतो.

माणूस परिपूर्णतेचा अविष्कार सादर करताना नवे नवे मापदंड आखत असतो आणि तेच मापदंड ओलांडण्यासाठी, सादरीकरणात पुन्हा जास्तीत जास्त परिपूर्णता आणण्याचा प्रयत्न करत असतो.

कलेच्या सादरीकरणात परिपूर्णतेची आवश्यकता असते मात्र प्रत्येक वेळी कलेच्या आविष्कारात ती परिपूर्णता लाभेलच ह्याची खात्री नसते. त्यामुळे काही वेळा परिपूर्णतेच्या सोबत सातत्यही राखणे जरुरी असते. त्या सातत्याने अंतिम ध्येय गाठता येते.

'Sometimes consistent effort is more important than perfection because timely achievement is better than delayed perfection.

ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करता काही वेळा त्या परिपूर्णतेचा हव्यास बाळगणे चुकीचे ठरते. काही अपवादात्मक बाबींमध्ये, परिपूर्णतेतील अपूर्णता त्या वस्तूला अथवा गोष्टींना वेगळेच सौंदर्य बहाल करते. उदाहरण द्यायचे तर, चॉकलेट हिरो देवानंद अगदी रूपवान, त्यांचे देखणे सौंदर्य होते आणि चिरतरुण व्यक्तिमत्व. देवानंद ह्यांचा एक दात तुटलेला होता. मात्र हिच दंतपंक्तीतील मोकळी जागा, त्यांच्या हास्याला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त करून देते. एक जमाना होता, त्या देवानंदच्या तुटलेल्या दातावर त्या काळची युवा पिढी इतकी फिदा होतो की बऱ्याच तरुणांनी त्या काळी जाणीवपूर्वक तसा स्वतःचा विशिष्ट दात काढून टाकला होता.

दुसरे उदाहरण म्हणजे कुमार गंधर्व. शास्त्रीय गायनात आलाप गाताना गायकाचा श्वास आणि सुदृढ फुप्फुसांचा मोठा वाटा असतो, त्यामुळेच त्या गायकीला परिपूर्णता येते मात्र कुमार गंधर्व ह्यांचे एक फुप्फुस तेवढे कार्यक्षम नव्हते. असे म्हणतात, त्या कमतरतेवर मात करत पंडित कुमार गंधर्व ह्यांनी एक खास शैली निर्माण केली, जणू त्या परिपूर्णतेतील अपूर्णतेने त्य गायकीला नवे सौंदर्य प्राप्त झाले.

प्रिती झिंटा ह्या अभिनेत्रीच्या गालावरील खळी त्या चेहऱ्याला वेगळे सौंदर्य प्राप्त करून देते. अशी कित्येक उदाहरण आहेत, की ज्या अपूर्णतेमुळे त्या गोष्टींना, व्यक्तींना एक वेगळे सौंदर्य, नजाकात प्राप्त होते.

आपल्या संस्कृतीत, परिपूर्णतेतील अपूर्णता सहज स्वीकारली जाते किंबहुना त्यात नवे सौंदर्य शोधण्याचा प्रयत्न असतो. लहान बाळाला, त्याच्या नाजूक चेहऱ्याला दृष्ट लागू नये म्हणून काळे तीट लावतात, त्यामुळे ते बाळ अजून छान दिसते.

जपान मध्ये एखादा चिनी मातीच्या किमती कप तुटला अथवा फुलदाणी तुटली किंवा त्याला भेग पडली तर ती भेग एका विशिष्ट सोनेरी रंगाने भरतात जेणेकरुन ती भेग जास्त उठावदार दिसेल. अश्या चिनी मातीच्या भंगलेल्या वस्तू, सांधे भरून दर्शनी भागात ठेवतात, किंबहुना अशी परिपूर्णतेतील अपूर्णता जपून ती अपूर्णता अधोरेखित केली जाते, ज्यामुळे त्या वस्तूला वेगळे सौंदर्य बहाल होते.

कृष्णाच्या सावळ्या रंगामुळे त्याला वेगळे सौंदर्य प्राप्त झाले आणि त्याचे 'घनःश्याम' हे नामकरण झाले.

सरते शेवटी काय, प्रत्येक निसर्ग निर्मित वस्तू असो वा व्यक्ती, त्यामध्ये काही बलस्थाने आणि कमतरता असतातच. अश्या वेळी त्या वस्तू वा व्यक्तींमध्ये असलेले सौदर्य न्याहाळणे महत्वाचे ठरते. कमतरतेपेक्षा बलस्थाने बघितली तर सौंदर्य दृष्टीस पडते. काही सौंदर्य उपजत असते तर काही सौंदर्य कालानुरूप विपरित परिस्थितीत तग धरून राहिल्याने प्राप्त होत जाते.

'हिरा' हा एकेकाळी कोळसाच असतो मात्र प्रचंड दबावाखाली कालानुरूप त्या कोळशाचे रूपांतर हिऱ्यात होत असते.

'समुद्राच्या पाण्याचा एक थेंब शिंपल्यात शिरतो आणि त्याचा मोती बनतो.'

**- मनोज कुरुंभटी**